Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

# MPSC
# Group B
## Previous Year Paper
### (Mains) Paper-I
### 01 Oct, 2023

Teachingninja.in

संच क्र. **B**

# 2022

## प्रश्नपुस्तिका – I
## मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान

**X17**

प्रश्नपुस्तिका क्रमांक BOOKLET NO. 307898

एकूण प्रश्न : 100

वेळ : 1 (एक) तास

एकूण गुण : 200

B

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम–82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

Teachingninja.in

1. खालीलपैकी देशी शब्द कोणता ?

a. कोवळा
b. भगवान
c. ढेकूण
d. बटन

(1) a आणि b बरोबर
(2) c आणि d बरोबर
(3) फक्त c बरोबर
(4) फक्त d बरोबर

2. शुद्ध शब्दांचा गट ओळखा.

a. कर्मेंद्रीय, कबुलिजबाब, प्रतिकात्मक
b. कर्मेंद्रिय, कबुलीजबाब, प्रतीकात्मक
c. उच्छृंखल, आसेतुहिमालय, गप्पिष्ट
d. उत्छृंखल, असेतूहिमालय, गप्पीष्ट

(1) a व c बरोबर
(2) b व d बरोबर
(3) a, b, c बरोबर
(4) b व c बरोबर

3. संख्याविशेषणे आणि त्यांची उदाहरणे यांच्या योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| a. संख्यावाचक | i. दुप्पट, चौपट, दुहेरी, तिहेरी |
| b. क्रमवाचक | ii. दोघे, तिघे, पाची, साती |
| c. आवृत्तीवाचक | iii. थोडा, फार, सर्व, इतर |
| d. अनिश्चित | iv. पहिला, पाचवा, दहावा, शंभरावा |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | ii | iv | i | iii |
| (2) | iii | ii | i | iv |
| (3) | iv | iii | ii | i |
| (4) | ii | i | iv | iii |



Teachingninja.in

4. 'अवग्रह' हे विरामचिन्ह कधी वापरले जाते ?
   (1) अक्षराचा उच्चार लांब आहे हे सुचवण्यासाठी
   (2) उच्चारात खंड आहे हे दाखवण्यासाठी
   (3) दोन शब्द जोडण्यासाठी
   (4) एखाद्या संकल्पनेचे स्पष्टीकरण करण्यासाठी

5. की, ता, ई हे प्रत्यय लागून साधलेली भाववाचक नामे कोणत्या लिंगी असतात ?
   (1) पुल्लिंगी
   (2) स्त्रीलिंगी
   (3) नपुंसकलिंगी
   (4) यापैकी नाही

6. 'आंबा चवीला गोड होता.' या वाक्यातील चतुर्थीच्या उपपदार्थाचा अर्थ काय ?
   (1) परिणाम
   (2) मूल्य
   (3) विषय
   (4) योग्यता

7. 'अपादान' हा कोणत्या विभक्तीचा अर्थ आहे ?
   (1) चतुर्थी
   (2) पंचमी
   (3) षष्ठी
   (4) सप्तमी

8. तद्धित प्रत्यय कोणत्या शब्द जातींना लागतात ?
   a. क्रियापद
   b. नाम
   c. विशेषण
   d. अव्यये
   (1) फक्त a बरोबर
   (2) फक्त b व c बरोबर
   (3) फक्त d बरोबर
   (4) b, c व d बरोबर

9. ऊकारान्त स्त्रीलिंगी एकवचनी नामाचे सामान्यरूप एकारान्त होते व अनेकवचनात _______ होते.
   (1) याकारान्त
   (2) वाकारान्त
   (3) आकारान्त
   (4) ईकारान्त

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

10. जोड्या लावा.

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| a. | कर्तरी प्रयोग | i. | रामाने रावणास मारले. |
| b. | कर्मणी प्रयोग | ii. | तू त्याला न्यायचे होतेस. |
| c. | भावे प्रयोग | iii. | त्याने कविता लिहिली. |
| d. | संकीर्ण प्रयोग | iv. | तो जातो. |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | iii | i | ii |
| (2) | iii | iv | i | ii |
| (3) | ii | i | iv | iii |
| (4) | iv | i | ii | iii |

11. खालीलपैकी विरुद्धार्थी अयोग्य शब्द जोडी ओळखा.

a. आगंतुक × आमंत्रित

b. कृपण × शूर

c. अनुज × अनुचित

d. शुद्धपक्ष × वद्यपक्ष

(1) b व c अयोग्य जोडी
(2) c व d अयोग्य जोडी
(3) फक्त c अयोग्य जोडी
(4) फक्त d अयोग्य जोडी

12. 'भाकरी करण्याची लाकडी परात' या शब्दसमुहासाठी खालीलपैकी योग्य शब्द ओळखा.

(1) काटवट (2) काथवट (3) कातवट (4) घंगाळ

13. उंटावरून टपाल वाटणाऱ्याला काय म्हणतात ?

(1) पोस्टमन (2) बकरंदाज (3) सांडणीस्वार (4) शिक्केनस्वी

14. पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्द तद्भव आहेत ?

a. कान, चाक, आग

b. घर, गाव, काम

c. गुरु, पुष्प, अग्नि

d. पोट, रेडा, चिमणी

(1) फक्त a बरोबर
(2) फक्त a आणि b बरोबर
(3) फक्त c बरोबर
(4) फक्त c आणि d बरोबर



Teachingninja.in

**15.** परकीय शब्द व भाषा यांच्या योग्य जोड्या जुळवा.

a. अरबी — i. हाराकिरी
b. जपानी — ii. स्फूटनिक
c. कन्नड — iii. फायदा
d. रशियन — iv. टपाल

(1) a – iii  b – iv  c – ii  d – i
(2) a – iv  b – iii  c – i  d – ii
(3) a – iii  b – i  c – iv  d – ii
(4) a – ii  b – i  c – iv  d – iii

**16.** देवालय, हिमालय हे शब्द कोणत्या संधीची उदाहरणे आहेत ?

(1) विसर्ग संधी
(2) स्वर संधी
(3) व्यंजन संधी
(4) हल संधी

**17.** कर्मभाव संकर प्रयोगात

a. कर्माप्रमाणे क्रियापदाचे रूप बदलते.
b. कर्म द्वितीयेत तर कर्ता तृतीया विभक्तीत असतो.
c. या वाक्यातील क्रियापद अंशत: कर्तरी असतो.

(1) फक्त a व c बरोबर
(2) फक्त b व c बरोबर
(3) फक्त c चूक
(4) फक्त c बरोबर

**18.** 'शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी सारे काही केले.' या वाक्याचे नकारार्थी वाक्य बनवा.

(1) शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी काहीच केले नाही.
(2) शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी काहीच केले नाही असे नाही.
(3) शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी थोडे केले नाही.
(4) शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी काही करायचे बाकी ठेवले नाही.

**19.** 'विठ्ठल परीक्षेत उत्तीर्ण झाला कारण त्याने प्रामाणिकपणे अभ्यास केला होता.' या वाक्याचा प्रकार ओळखा.

(1) केवल वाक्य
(2) संयुक्त वाक्य
(3) मिश्र वाक्य
(4) गौण वाक्य

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

20. खालीलपैकी आवृत्तीवाचक विशेषणांचा गट ओळखा ?

a. दररोज, प्रतिक्षण

b. दुहेरी, तिहेरी

c. पहिला, दुसरा

d. असला, तसला

(1) फक्त a बरोबर
(2) फक्त c बरोबर
(3) फक्त a आणि b बरोबर
(4) फक्त d बरोबर

---

**खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्र. क्र. 21 ते 25 ची उत्तरे पर्यायी उत्तरातून अचूक निवडा.**

विचारस्वातंत्र्य हेच लोकशाहीचे प्राणतत्त्व असल्याने विचारवंतांनी कोणत्याही परिस्थितीत प्रथम आपल्या माध्यमाशी इमान राखले पाहिजे. स्वार्थाखातर सत्याकडे पाठ फिरविणारे किंवा समाजाशी द्रोह करणारे लोक प्रत्येक क्षेत्रात थोडेफार असणारच. तात्त्विक विवेचनात त्यांचा विचार करण्याचे आपणास काही प्रयोजन नाही. परंतु विद्यावंत प्रामाणिक व नि:स्वार्थी असला तरी त्याच्याकडून आत्मवंचना होण्याचा संभव असतो. म्हणून आपण केवळ शुद्ध ज्ञानाचे उपासक आहोत, कोणत्याही विचारसंप्रदायाशी किंवा मूल्यसरणीशी आपण जखडलेलो नाही असे धरून चालणे श्रेयस्कर नाही. प्रत्येक माणसाच्या मनावर पूर्वसंस्कारांची, परंपरागत मूल्यसरणीची छाया असतेच असते. मग त्याला त्याची जाणीव असो वा नसो. तेव्हा सतत आत्मपरीक्षण करून स्वत:चे पूर्वग्रह जाणून घेणे, आपली विचारसरणी कोणत्या वर्गाच्या हितसंबंधांना पोषक आहे ते शोधून पाहणे हाच पूर्वग्रहांवर मात करून शास्त्रीय दृष्टी आत्मसात करण्याचा एकमेव उपाय आहे. मात्र निष्पक्षपातीपणाने निरनिराळ्या प्रश्नांचा अभ्यास करावयाचा, तर विचारवंताने इतिहासक्रमाचे स्थूलमानाने पण साकल्याने ज्ञान करून घेतले पाहिजे; सामाजिक जीवनातील प्रवाहाशी समरस झाले पाहिजे. याचा अर्थ त्याने आपली अभ्यासिका सोडून सभामैदान गाजवावे, राजकारणाच्या आखाड्यात उतरावे किंवा आर्थिक संघर्षात सहभागी व्हावे असा नाही. ज्ञानाच्या कक्षा आज इतक्या विस्तारलेल्या आहेत की, त्याच्या कोणत्याही एका शाखेवर प्रभुत्व मिळवू इच्छिणाऱ्या विद्यावंताला रात्रंदिवस आपल्या व्यासंगात रमून गेले पाहिजे. आजचा काळ हा श्रमविभागाचा आहे. म्हणून प्रत्येकाने आपल्या कार्यक्षेत्राच्या मर्यादा ओळखून वागले पाहिजे. विचारवंत हा विद्येची आराधना करूनच समाजाचे कल्याण साधू शकेल. मात्र अभ्यासासाठी त्याने निवडलेला विषय कितीही लहान असला, तरी त्याची दृष्टी संकुचित असता कामा नये. आपण संपादिलेले ज्ञान विद्याभिवृद्धीला किती उपकारक होईल, समाजाच्या अंतिम कल्याणाशी त्याचा कितपत संबंध पोहोचतो, याचे अनुसंधान त्याने सदैव राखले पाहिजे.

---

21. लोकशाहीचे प्राणतत्त्व कोणते ?

(1) माध्यमांशी इमान राखणे
(2) विचारस्वातंत्र्य
(3) विद्यावंत असणे
(4) समाजाचे अंतिम कल्याण



Teachingninja.in

22. प्रत्येक माणसाच्या मनावर कशाची छाया असते ?

(1) समाजाशी द्रोह करण्याची

(2) स्वार्थाखातर सत्याकडे पाठ फिरविण्याची

(3) पूर्वसंस्कारांची, परंपरागत मूल्यसरणीची

(4) आत्मवंचना होण्याची

23. शास्त्रीय दृष्टी आत्मसात करण्याचा एकमेव उपाय कोणता ?

(1) संकुचित दृष्टी ठेवणे

(2) पूर्वग्रहांवर मात करणे

(3) सदैव अनुसंधान राखणे

(4) कार्यक्षेत्राच्या मर्यादा ओळखणे

24. निष्पक्षपातीपणे विविध प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी काय केले पाहिजे ?

अ. इतिहास क्रमाचे स्थूल मानाने पण साकल्याने ज्ञान करून घेणे.

ब. सामाजिक जीवनातील प्रवाहाशी समरस होणे.

क. सभामैदान गाजवणे.

(1) फक्त अ

(2) फक्त ब

(3) ब आणि क

(4) अ आणि ब

25. सामाजिक जीवनात समरस होण्यासाठी कोणत्या गोष्टींची गरज नाही असे लेखकाला वाटते ?

(1) आपली अभ्यासिका सोडून सभामैदान गाजवावे

(2) राजकारणाच्या आखाड्यात उतरावे

(3) आर्थिक संघर्षात सहभागी व्हावे

(4) वरील तीनही पर्याय योग्य आहेत

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

26. शब्दयोगी अव्यये व त्याची उदाहरणे यांच्या योग्य जोड्या जुळवा.

a. विशेषणसाधित — i. देखील, लागी.

b. धातुसाधित — ii. जवळून, मागून.

c. क्रियाविशेषणसाधित — iii. योग्य, विरुद्ध.

d. संस्कृतशब्दसाधित — iv. पर्यंत, सक्षम.

(1) a – iii b – iv c – i d – ii

(2) a – iv b – iii c – ii d – i

(3) a – iii b – i c – ii d – iv

(4) a – ii b – i c – iv d – iii

---

27. खालीलपैकी कोणते वैशिष्ट्य केवलप्रयोगी अव्ययाचे नाही ?

a. ती वाक्याच्या आरंभी येतात.

b. ती वाक्याचा भाग नसल्याने त्यांना विभक्ति प्रत्यय नसतो.

c. एकच उद्गारवाचक शब्द विविध भावना व्यक्त करतो.

d. केवलप्रयोगी अव्ययांचे प्रकार त्याच्या स्वरूपावरून ठरतात.

(1) फक्त b बरोबर

(2) फक्त c बरोबर

(3) फक्त a व c बरोबर

(4) फक्त d बरोबर

---

28. 'शूलपाणी', 'मानधन', 'काळतोंड्या' हे शब्द बहुव्रीही समासाच्या कोणत्या उप-प्रकाराचे आहेत ?

(1) चतुर्थी बहुव्रीही

(2) पंचमी बहुव्रीही

(3) षष्ठी बहुव्रीही

(4) सप्तमी बहुव्रीही

---



Teachingninja.in

**29.** जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| a. सिद्ध शब्द | i. घरघर, हळूहळू, शेजारीपाजारी |
| b. साधित शब्द | ii. देवघर, पोळपाट, नीळकंठ |
| c. सामासिक शब्द | iii. शिलाई, लढाऊ, पुजारी |
| d. अभ्यस्त शब्द | iv. जा, ये, कर, खा, पी, घे |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | iii | ii | i |
| (2) | i | ii | iii | iv |
| (3) | ii | iii | iv | i |
| (4) | iii | i | ii | iv |

**30.** तत्पुरुष समास व उदाहरणे यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. तृतीया तत्पुरुष | i. व्याहीभोजन, वाटखर्च |
| b. चतुर्थी तत्पुरुष | ii. घरधंदा, विद्यापारंगत |
| c. षष्ठी तत्पुरुष | iii. उपासमार, दयार्द्र |
| d. सप्तमी तत्पुरुष | iv. ज्ञानयज्ञ, गणपती |

(1) a – iii  b – i  c – ii  d – iv

(2) a – iv  b – iii  c – ii  d – i

(3) a – ii  b – i  c – iii  d – iv

(4) a – iii  b – i  c – iv  d – ii

**31.** खालील गटातून अल्पप्राण व्यंजनांचा गट ओळखा.

(1) थ, स, ष, ढ

(2) क, ज, ण, प

(3) भ, फ, घ, ह

(4) झ, ध, घ, श

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

32. स्वरांचे प्रकार व त्यांच्या व्याख्या यांच्या जोड्या जुळवा.

a. दीर्घ स्वर — i. एकाच उच्चारस्थानातून निघणारे स्वर
b. संयुक्त स्वर — ii. भिन्न उच्चारस्थानातून निघणारे स्वर
c. सजातीय स्वर — iii. स्वरांचा उच्चार करण्यास अधिक वेळ
d. विजातीय स्वर — iv. दोन स्वर एकत्र येऊन बनलेले स्वर

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | ii | iv | i |
| (2) | iii | iv | i | ii |
| (3) | ii | i | iii | iv |
| (4) | iv | iii | ii | i |

33. खालीलपैकी कोणते देवनागरी लिपीचे वैशिष्ट्य नाही ?

a. गतीयुक्त आणि व्यावहारिक लिपी
b. वर्णमालेचे वैज्ञानिक वर्गीकरण
c. दुहेरी लिपीचिन्हांचा समावेश
d. ऱ्हस्व आणि दीर्घ मात्रांची व्यवस्था

(1) फक्त a आणि b
(2) फक्त b आणि d
(3) फक्त c
(4) फक्त b

34. योग्य विग्रह केलेला पर्याय निवडा.

'सदाचार'

a. सद् + आचार
b. सत् + आचार
c. सदा + चार
d. सच् + आचार

(1) फक्त a बरोबर
(2) फक्त b बरोबर
(3) a आणि b बरोबर
(4) c आणि d बरोबर



Teachingninja.in

35. समानार्थी शब्दांचा योग्य तो पर्यायी गट ओळखा.

a. सुधा, तनया, आत्मजा
b. सरिता, कोमल, राघू
c. अनुज, उद्योगी, अनिल
d. पाय, पान, पाणी

(1) फक्त a बरोबर बाकी सर्व चूक
(2) फक्त d बरोबर बाकी सर्व चूक
(3) a व c बरोबर
(4) b व d बरोबर

36. 'गळ्याला तात लावणे' या वाक्प्रचाराचा अर्थ ओळखा.

(1) गुप्त ठेवणे
(2) प्राणांतिक संकटात घालणे
(3) आत्महत्या करायला लावणे
(4) समूळ नायनाट करणे

37. 'हात ओला करणे' या वाक्प्रचाराचा खालीलपैकी कोणता अर्थ आहे ?

(1) हात धुऊन घेणे
(2) हातपाय गाळणे
(3) पैसा मिळणे
(4) हातावर पाणी टाकणे

38. 'अनेक जणांवर सोपवलेले काम कोणीच नीट पार पाडत नाहीत.' या अर्थाची म्हण ओळखा.

(1) बिगारीचे घोडे तरवटाचा फोक
(2) बारभाईची शेती काय लागेल हाती
(3) भ्रमाची पुडी नि हिंगाचा वास
(4) भरवशाची मोट पाण्यात लोट

39. म्हण पूर्ण करा.

'मोले घातले राडाया ________'

(1) हासती साऱ्या बाया
(2) नाही आसू नाही माया
(3) सारे पडती पाया
(4) सारे गेले वाया

40. 'गंगेचे पाणी घेऊन गंगेलाच अर्घ्य' या म्हणीच्या अर्थासारखी दुसरी म्हण पर्यायातून निवडा.

(1) घरोघर मातीच्या चुली
(2) जशी देणावळ तशी धुणावळ
(3) गुळाचा गणपती, गुळाचा नैवेद्य
(4) गुरुची विद्या गुरुस फळली

41. 'बोलण्याचा आणि खाण्याचा संबंध काय ?' या वाक्याचे नकारार्थी वाक्यात रूपांतर कसे होईल ?

(1) बोलण्याचा आणि खाण्याचा काय संबंध असतो ?
(2) बोलण्याचा आणि खाण्याचा संबंध काहीच नसतो.
(3) बोलण्याचा आणि खाण्याचा संबंध असतो.
(4) बोलण्याचा आणि खाण्याचा संबंध असतो का ?



Teachingninja.in

42. संयुक्त वाक्याचे मिश्र वाक्यात रूपांतर करा.

'माझा अभ्यास झाला नाही म्हणून मी शाळेत जाणार नाही.'

(1) माझा अभ्यास न झाल्यामुळे शाळेत जाणार नाही.
(2) मी शाळेत जाणार नाही कारण माझा अभ्यास झाला नाही.
(3) माझा अभ्यास झाला नाही मी शाळेत जाणार नाही.
(4) माझा अभ्यास झाला असता तर मी शाळेत गेलो असतो.

---

43. 'गांधीजींना सुताच्या माळा अधिक आवडत.' या वाक्यातील विधेयपूरक ओळखा.

(1) सुताच्या
(2) माळा
(3) अधिक
(4) गांधीजींना

---

44. एखाद्या नामाचे स्पष्टीकरण करणाऱ्या व नामापूर्वी येणाऱ्या त्याच अर्थाच्या शब्दांस __________ म्हणतात.

(1) उद्देश
(2) पूरक
(3) समानाधिकरण
(4) विधेयपूरक

---

45. 'ज्याचे आपल्यावर उपकार आहेत, त्याची आपण स्वाभाविकपणे स्तुती करतो' या अर्थाचा वाक्प्रचार ओळखा.

(1) सुताने स्वर्ग गाठणे
(2) कोल्हेकुई करणे
(3) वर्चस्व प्रस्थापित करणे
(4) ज्याची खावी भाकरी, त्याची करावी चाकरी

---

46. जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. गणवाचक विशेषणे | i. प्रथम, विसावा, दुसरा |
| b. क्रमवाचक विशेषणे | ii. हरएक, दरएक, एकेक |
| c. पृथकत्ववाचक विशेषणे | iii. हजार, कोटी, अर्धा |
| d. आवृत्तीवाचक विशेषणे | iv. एकेरी, त्रिगुणी, चौपट |

(1) a – iv  b – iii  c – ii  d – i
(2) a – iii  b – i  c – ii  d – iv
(3) a – ii  b – iv  c – iii  d – i
(4) a – iii  b – iv  c – i  d – ii

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**47.** खालील वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.

'मुलांनी चावऱ्या कुत्र्याला खडे मारले.'

(1) उभयविध क्रियापद

(2) द्विकर्मक क्रियापद

(3) शक्य क्रियापद

(4) प्रयोजक क्रियापद

**48.** जी सहाय्यक क्रियापदे सर्व काळी, सर्व पुरुषी चालत नाहीत त्यांना कोणत्या प्रकारची क्रियापदे म्हणतात ?

(1) मुख्य क्रियापदे

(2) गौण क्रियापदे

(3) उभयविध क्रियापदे

(4) संयुक्त क्रियापदे

**49.** साधित क्रियाविशेषणे व त्यांची उदाहरणे यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. नामसाधित | i. शास्त्रदृष्ट्या, दररोज |
| b. विशेषणसाधित | ii. पूर्वीचा, आरंभीला |
| c. अव्ययसाधित | iii. एकदा, सर्वत्र |
| d. समासघटित | iv. सकाळी, प्रथमत: |

(1) a – iv b – iii c – i d – ii

(2) a – iii b – ii c – iv d – i

(3) a – iv b – iii c – ii d – i

(4) a – ii b – iv c – iii d – i

**50.** खालील क्रियाविशेषणांच्या त्यांच्या प्रकारानुसार जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| a. स्थलवाचक | i. जसे, तसे, उगीच |
| b. कालवाचक | ii. आज, उद्या, काल |
| c. संख्यावाचक | iii. पहिला, दोनदा, चौपट |
| d. गुणवाचक | iv. समोर, वर, खाली |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | ii | iii | i |
| (2) | ii | iv | i | iii |
| (3) | iv | i | iii | ii |
| (4) | iii | ii | i | iv |

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

51. 'The husband and the wife next door have cat and dog existence.'

The idiom 'cat and dog existence' used in the sentence above means

(1) animal existence
(2) uncultured life
(3) perpetual quarrelling
(4) negligible existence

52. Identify the voice of the following sentences from options given below :

a. Do not insult the poor.
b. Let the poor be not insulted.

(1) a-Passive voice, b-Active voice
(2) a-Active voice, b-Passive voice
(3) both a and b are in Active voice
(4) both a and b are in Passive voice

53. 'She cast aside all shame and eloped with her boy friend.'

The idiom 'cast aside' occurring in the sentence above implies

(1) neglected
(2) rejected
(3) forgot
(4) tolerated

54. Identify the kind of noun the underlined word is in the following sentence :

The table is made of wood.

(1) Common noun
(2) Proper noun
(3) Material noun
(4) Collective noun

55. Which one of the following sentences is wrong/incorrect ?

a. Those sort of messages are not to my taste.
b. Those sort of messages is not to my taste.

(1) a is wrong b is correct
(2) a is correct b is wrong
(3) both a and b are correct
(4) both a and b are incorrect

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

56. Why did he punish you ?

Which of the following options is the correct passive voice of the above sentence ?

a. Why you were punished by him ?

b. Why was he punished by you ?

c. Why were you punished by him ?

d. Who was punished by you ?

(1) a only
(2) a and b only
(3) c only
(4) c and d only

57. If it wasn't so tragic, it would be ________.

Complete the sentence choosing the correct antonym.

(1) idiotic
(2) comic
(3) foolish
(4) ridiculous

58. She was always solicitous about the welfare of her students.

Identify the correct meaning of the word underlined.

(1) strong
(2) concerned
(3) reliable
(4) kind

59. Fill in the correct article in the following sentences.

a. He is ________ biologist.

b. Music is ________ food of love.

(1) a – an, b – a
(2) a – the, b – a
(3) a – a, b – the
(4) a – the, b – the

60. Stoic is a person.

Choose the correct phrase for the word underlined.

(1) indifferent to pain or pleasure
(2) who loves mankind
(3) of sanguine disposition
(4) reluctant to mix in society

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

61. Identify the incorrect sentence/s.

a. The silver is a precious metal.

b. He is studying in the university.

c. He was absent for the last two days.

(1) Only a and b
(2) Only b and c
(3) Only b
(4) Only a

62. Which one of the following sentences is incorrect ?

a. It is nothing else than arrogance.

b. It is nothing else but arrogance.

(1) a is incorrect b is correct
(2) a is correct b is incorrect
(3) both a and b are correct
(4) both a and b are incorrect

63. Read the following sentences carefully and find out which one of them is incorrect ?

a. I shall say this on her face.

b. I shall say this to her face.

(1) a is correct
(2) b is incorrect
(3) a is incorrect
(4) b is correct

64. 'It has been raining since eight O'clock this morning'.

The tense used in the sentence above is

(1) Progressive form of the present tense.

(2) Past form of the perfect tense.

(3) Present perfect tense.

(4) Progressive form of the perfect tense.



Teachingninja.in

**65.** Subordinate ________ the orders of their superiors.

Select the correct phrase to complete the sentence meaningfully.

(1) Carry on
(2) Carry out
(3) Carry off
(4) Carry weight

**66.** Read the sentences carefully and find out which one of the two is incorrect/correct from the options given below.

a. The insurance company has to pay for the damages to my scooter.

b. The insurance company has to pay for the damage to my scooter.

(1) a is incorrect b correct
(2) both a and b are incorrect
(3) a is correct b is incorrect
(4) both a and b are correct

**67.** Identify the correct sentence/s.

a. They received 100 bales of cotton.

b. He was released on bail.

c. The peon rings the bail at 5 p.m.

(1) Only a is correct
(2) Only a and b are correct
(3) Only b and c are correct
(4) Only c is correct

**68.** Read the following sentences carefully and find out the correct answer from the options below.

a. John is my cousin brother.

b. John is my cousin.

(1) a is incorrect b is correct
(2) a is correct b is incorrect
(3) both a and b are incorrect
(4) both a and b are correct

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

69. The meaning of the word 'Laissez – Faire' is expressed by the phrase

(1) Capable of being clearly read

(2) Capable of being clearly heard

(3) Non-interference of government in trade, commerce, industry etc.

(4) The government of a few select people

70. Choose the option showing the correct meaning of the words underlined.

a. The road winds up the mountain.

b. The campaign was winding down.

c. He is still trying to get his wind back.

(1) a – turns, b – came to an end, c – breath

(2) a – brings to close, b – twists, c – breeze

(3) a – irritates, b – conclude, c – gale

(4) a – wraps, b – twisted, c – breathe

Read the following passage carefully and answer the Question No. **71 – 75** given below it.

Sociability should also be exhibited in our dealings with animals. They too are sentient beings and some of them are capable of attachment and devotion to human beings and to one another. Men killed many animals in the early period of civilization in order to clear the jungle and the same cruel but unavoidable process can be witnessed in new colonies. There are also noxious, venomous and ferocious animals like tigers, jaguars, wolves, sharks, snakes and others, which kill us and we must kill them. We are not responsible for their appearance on earth and they cannot be tamed and used. There was only one wolf of Gubbio and even he does not exist. Rats, flies, wasps, locusts, white ants and other animals destroy our property or spread disease; they must be destroyed. We cannot afford to feed all these hungry hordes. Zoroaster enjoined upon all his disciples the duty of exterminating such pests and you should follow his teaching. But all animals



Teachingninja.in

which are employed in the service of man should be treated with the greatest kindness and sympathy. They are your colleagues and comrades. They have also done their part in building up the fabric of civilization. Feed them well; lay not too heavy burdens on them; give them medicine and a holiday when they are sick; allow them a day of rest now and than; give them a warm blanket in cold weather; speak affectionately to them at times. They can feel the words of love, though they do not understand them. The cow, the ass, the shepherd's dog, the horse, the camel, the bullock, the elephant, the milkman's dog, the pony, the yak and other domesticated animals are humble and helpless members of the fellowship of labour. They must not be robbed of their rights, especially as they cannot strike back or agitate for the redress of their grievances.

---

**71.** The animals serving human beings are very close and trusted friends.

Choose the correct word for the underlined.

(1) Hordes

(2) Comrades

(3) Pets

(4) Disciples

---

**72.** According to the passage Sociability means

(1) Spreading the ideas of culture

(2) Inclination to be friendly

(3) Considering all the animals socially equal

(4) Treating animals like animals

---

**73.** Identify the correct sentence/s.

a. The animals which destroy our health property must be destroyed.

b. Before building new colonies we can see the builders reviving the process of civilization.

c. We must be friendly towards animals even if they are vicious.

d. Some of the animals serve human beings affectionately.

(1) Only a and b (2) Only b, c and d

(3) Only a and c (4) Only a, b and d

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**74.** According to the passage which of the following is/are correct ?

a. The domesticated animals are as humble and helpless as the poor labourers are.

b. The animals which serve man are our equal companions.

c. Some of the animals are capable of devoting themselves to God.

(1) Only a and b

(2) Only b and c

(3) Only a and c

(4) Only c

---

**75.** Zoroaster imposed upon his people to annihilate the pests.

Choose the correct synonym of the word underlined.

(1) to enjoin

(2) to employ

(3) to exterminate

(4) to treat

---

**76.** There was no woman present but wept at the news.

The underlined clause in the sentence above is a/an

(1) Noun clause

(2) Adjective clause

(3) Adverbial clause

(4) Co-ordinate clause

---

**77.** Read the sentences carefully and find out which one of them is incorrect ?

a. The thief hid himself in a shed.

b. The thief hid in a shed.

(1) a is correct

(2) b is incorrect

(3) a is incorrect

(4) b is correct



Teachingninja.in

78. The doctor asked the patient, "Did you eat anything this morning ?" (Change into indirect speech)

(1) The doctor asked the patient if he ate anything that morning.

(2) The doctor asked the patient that whether he had eaten anything that morning.

(3) The doctor asked the patient whether he had been eaten anything that morning.

(4) The doctor asked the patient whether he had eaten anything that morning.

79. 'I am a grammarian'.

The correct tag question corresponding to the sentence above is

(1) Am I ?

(2) Aren't I ?

(3) Amn't I ?

(4) Am I not ?

80. Identify the correct conditional sentence/s.

a. If it rains, we would stay indoors.

b. If the thief would come into my room, I would hit him.

c. If you had come five minutes earlier, you would have got a seat.

(1) Only a

(2) Only b

(3) Only c

(4) Only b and c

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

81. फिफा U-17 महिला जागतिक चषक 2022 बाबत अयोग्य कथन ओळखा.
(1) फिफा U-17 महिला जागतिक चषक 2022 चा आयोजक भारत आहे.
(2) फिफा U-17 महिला जागतिक चषक दर तीन वर्षांनी आयोजित करण्यात येते.
(3) फेडरेशन इंटरनॅशनल फुटबॉल असोसिएशन द्वारे ही स्पर्धा आयोजित केली जाते.
(4) फिफा U-17 महिला जागतिक चषक 2022 ही फिफा U-17 महिला जागतिक चषकाची सातवी आवृत्ती आहे.

Select the incorrect statement about FIFA Under-17 Women's World Cup 2022.
(1) India is hosting the FIFA Under-17 Women's World Cup 2022.
(2) The FIFA U-17 Women's World Cup is held every three years.
(3) It is organised by Federation International Football Association.
(4) The FIFA U-17 Women's World Cup 2022 is 7th Edition of the FIFA U-17 Women's World Cup.

---

82. योग्य जोड्या जुळवा.

| (राज्य) | (लोकनृत्य) |
|---|---|
| अ. आंध्रप्रदेश | i. मोहिनीअट्टम |
| ब. गुजरात | ii. दहिकाला |
| क. केरळ | iii. विलासिनी नाट्यम |
| ड. महाराष्ट्र | iv. भवाई |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | i | ii | iii | iv |
| (2) | ii | iii | iv | i |
| (3) | iii | iv | i | ii |
| (4) | iv | i | ii | iii |

Match the following.

| (State) | (Folk dance) |
|---|---|
| a. Andhra Pradesh | i. Mohiniattam |
| b. Gujarat | ii. Dahikala |
| c. Kerala | iii. Vilasini Natyam |
| d. Maharashtra | iv. Bhavai |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | i | ii | iii | iv |
| (2) | ii | iii | iv | i |
| (3) | iii | iv | i | ii |
| (4) | iv | i | ii | iii |



Teachingninja.in

४३. ग्रंथ आणि लेखक यांच्या जोड्या लावा. [2022 बुकर पुरस्कार]

| 'अ' (ग्रंथ) | 'ब' (लेखक) |
|---|---|
| अ. ग्लोरी | i. शेहन करुणातिलका |
| ब. स्माल थिंग्ज लाईक दीज | ii. ॲलन गार्नर |
| क. ट्रियाकल वॉकर | iii. क्लाएर किगन |
| ड. द सेव्हन मून्ज ॲट माली अलमाइडा | iv. नो वायोलेट बुलावायो |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | i | iii | iv | ii |
| (2) | iv | iii | ii | i |
| (3) | iv | ii | iii | i |
| (4) | i | iv | ii | iii |

Match the pairs of books and authors. [2022 Booker Prize]

| 'A' (Book) | 'B' (Author) |
|---|---|
| A. Glory | i. Shehan Karunatilaka |
| B. Small Things Like These | ii. Alan Garner |
| C. Treacle Walker | iii. Claire Keegan |
| D. The Seven Moons at Maali Almeida | iv. No Violet Bulawayo |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (1) | i | iii | iv | ii |
| (2) | iv | iii | ii | i |
| (3) | iv | ii | iii | i |
| (4) | i | iv | ii | iii |

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

84. खालीलपैकी कोणती राज्ये महादयी नदीच्या पाणी वाटपाच्या वादात सहभागी आहेत ?

अ. गोवा

ब. कर्नाटक

क. तेलंगाना

ड. आंध्रप्रदेश

(1) फक्त ब, क आणि ड
(2) फक्त अ आणि ब
(3) फक्त क आणि ड
(4) अ, ब, क आणि ड

Which of the following States are involved in the dispute over the sharing of the water of the Mahadayi River ?

a. Goa

b. Karnataka

c. Telangana

d. Andhra Pradesh

(1) only b, c and d
(2) only a and b
(3) only c and d
(4) a, b, c and d

85. खालीलपैकी कोणत्या व्यक्तीला फ्रेंच सरकारचा सर्वोच्च सन्मान – शेवॉलियर डे आय ऑरड्रे डेस आर्ट एट डेस पुरस्काराने 2022 मध्ये सन्मानित करण्यात आले आहे ?

(1) करुणा साईराम
(2) प्रभा अत्रे
(3) अरुणा साईराम
(4) लता मंगेशकर

Which of the following person has been honoured with the French Government's highest honour – Chevalier de I'ordre des Art et des award in 2022 ?

(1) Karuna Sairam
(2) Prabha Atre
(3) Aruna Sairam
(4) Lata Mangeshkar



Teachingninja.in

86. खालीलपैकी कोणत्या नद्या गोदावरीच्या उजव्या तीराच्या उपनद्या आहेत ?

अ. प्रवरा

ब. मंजिरा

क. मणेर

ड. पूर्णा

ई. इंद्रावती

(1) फक्त अ, ब आणि क
(2) फक्त क, ड आणि ई
(3) फक्त अ, ब, ड आणि ई
(4) अ, ब, क, ड आणि ई

Which of the following rivers are right bank tributaries of Godavari ?

a. Pravara

b. Manjira

c. Maner

d. Purna

e. Indravathi

(1) only a, b and c
(2) only c, d and e
(3) only a, b, d and e
(4) a, b, c, d and e

---

87. खालीलपैकी कोणत्या इनोव्हेशन ट्रेंडचा 2022 मध्ये कृषी तंत्रज्ञानावर अधिक परिणाम झाला होता ?

(1) रोबोटिक्स
(2) आर्टिफिशल इंटेलिजन्स
(3) इंटरनेट ऑफ थिंग्ज
(4) ड्रोन्स

Which of the following innovation trend had more impact on the Agri Tech in 2022 ?

(1) Robotics
(2) Artificial Intelligence
(3) Internet of Things
(4) Drones

---

88. ५५ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवात प्रतिष्ठित व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार कोणाला प्रदान करण्यात आला ?

(1) विक्रम गोखले
(2) विजय चव्हाण
(3) मृणाल कुलकर्णी
(4) आशा पारेख

Who was conferred with the prestigious V. Shantaram Lifetime Achievement Award at the 55th Maharashtra State Marathi Film Festival ?

(1) Vikram Gokhale
(2) Vijay Chavhan
(3) Mrinal Kulkarni
(4) Asha Parekh

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

89. भारत, मोझांबिक, टांझानिया त्रिपक्षीय सराव (IMT TRILAT) संयुक्त सागरी सरावाची पहिली आवृत्ती __________ येथे 2022 मध्ये आयोजित करण्यात आली होती.

(1) नवी दिल्ली
(2) दार इस सलाम
(3) मापुटो
(4) यापैकी नाही

The first edition of India-Mozambique-Tanzania Trilateral Exercise (IMT TRILAT) a joint maritime exercise was held at __________ in 2022.

(1) New Delhi
(2) Dar Es Salaam
(3) Maputo
(4) None of these

---

90. दुलीप ट्रॉफी कोणत्या खेळाशी संबंधित आहे ?

(1) हॉकी
(2) क्रिकेट
(3) टेनिस
(4) बॅडमिंटन

Duleep trophy is associated with which sports ?

(1) Hockey
(2) Cricket
(3) Tennis
(4) Badminton

---

91. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत पदनिर्देशित अधिकाऱ्याला प्रोत्साहन देण्यासाठी व त्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी त्याला प्रदान करता येईल

a. प्रोत्साहनपर रोख रक्कम
b. प्रशस्ती पत्र
c. सेवा अभिलेखात तशी नोंद
d. सेवेत पदोन्नती

वरीलपैकी कोणते पर्याय बरोबर आहेत ?

(1) फक्त a, b, c
(2) a, b, c आणि d
(3) फक्त b, c, d
(4) फक्त a, d

To encourage and enhance efficiency of the designated officer under Maharashtra Right to Public Services Act 2015, he can be granted

a. Cash incentive
b. Certificate of appreciation
c. Corresponding entry in service record
d. Promotion in service

Which of the options given above are correct ?

(1) only a, b, c
(2) a, b, c and d
(3) only b, c, d
(4) only a, d



Teachingninja.in

92. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये खालील विधानांचे अवलोकन करा.

विधान I : सदर कायद्याच्या कलम 16(1) मध्ये 'केंद्रीय मुख्य माहिती आयुक्तांच्या सेवा कार्यकाल आणि सेवेच्या अटी' विहित केलेल्या आहेत.

विधान II : कायद्याच्या कलम 16(1) मध्ये सुधारणा अधिनियमाच्या कलम 3 नुसार 'ते ज्या तारखेला कार्यालयात प्रवेश करतात त्या तारखेपासून पाच वर्षाच्या कालावधीसाठी' हे शब्द सुधारित करून समाविष्ट केले आहेत.

(1) विधान I बरोबर; II चूक
(2) विधान I चूक; II बरोबर
(3) दोन्ही विधाने बरोबर
(4) दोन्ही विधाने चूक

Observe the following statements in view of Right to Information Act, 2005.

Statement I : Section 16(1) of the Act, provides the 'term of office and conditions of services of Central Chief Information Commissioner'.

Statement II : Section 16(1) of the Act has been amended and inserted with the words 'term of five years from the date on which he enters upon his office' under Section 3 of Amendment Act.

(1) Statement I correct; II incorrect
(2) Statement I incorrect; II correct
(3) Both statements are correct
(4) Both statements are incorrect

93. 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५' चे कोणते कलम शासनास, सार्वजनिक प्राधिकरणास दिशानिर्देश जारी करण्यासाठी अधिकार प्रदान करतात ?

(1) कलम २४
(2) कलम २७(ब)
(3) कलम २९
(4) कलम २९(ब)

Which Section of 'The Maharashtra Right to Public Services Act, 2015' provides the powers to the Government to issue directions to the Public Authorities ?

(1) Section 24
(2) Section 27(b)
(3) Section 29
(4) Section 29(b)

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**94.** माहिती अधिकार अधिनियम, २००५ नुसार खालील विधानांचे अवलोकन करा.

विधान I : 'न्यायालयांच्या अधिकारितेस आडकाठी' च्या बाबतीत माहिती अधिकार कायदा, २००५ च्या कलम २३ अंतर्गत सांगितले आहे.

विधान II : माहितीचा अधिकार (दुरुस्ती) कायद्यामधील कलम ४ 'न्यायालयाच्या न्यायाधिकार क्षेत्रांच्या' संदर्भात तपशीलवार तरतूद प्रदान करते.

(1) विधान I बरोबर; II चूक
(2) विधान I चूक; II बरोबर
(3) दोन्ही विधाने बरोबर
(4) दोन्ही विधाने चूक

Consider the following statements in view of Right to Information Act, 2005.

Statement I : 'Bar of Jurisdiction of Courts' is provided under Section 23 of Right to Information Act, 2005.

Statement II : Section 4 of Right to Information (Amendment) Act provides the detailed provision in respect of 'Bar of Jurisdiction of Courts'.

(1) Statement I correct; II incorrect
(2) Statement I incorrect; II correct
(3) Both statements are correct
(4) Both statements are incorrect

---

**95.** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ नुसार खालील विधानांचे अवलोकन करा.

विधान I : या कायद्याचे कलम 3, सार्वजनिक सेवांच्या वितरणासाठी 'माहिती तंत्रज्ञानाच्या' वापराशी संबंधित आहे.

विधान II : कलम 3(a) सार्वजनिक सेवांच्या वितरणासाठी 'माहिती तंत्रज्ञानाचे' प्रकार प्रदान करते.

(1) विधान I बरोबर; II चूक
(2) विधान I चूक; II बरोबर
(3) दोन्ही विधाने बरोबर
(4) दोन्ही विधाने चूक

Consider the following statements in view of Maharashtra Right to Public Services Act, 2015.

Statement I : Section 3 of this Act, deals with use of 'Information Technology' for delivery of Public Services.

Statement II : Section 3(a) provides the types of 'Information Technology' for delivery of Public Services.

(1) Statement I correct; II incorrect
(2) Statement I incorrect; II correct
(3) Both statements are correct
(4) Both statements are incorrect

---



Teachingninja.in

**96.** आई.टी. अधिनियम, 2008 मध्ये आई.टी. अधिनियम, 2000 च्या तुलनेत कोणते मोठे बदल केले गेले ?

(1) सायबर गुन्ह्यांसाठी तुरुंगवासाची शिक्षा वाढवणे

(2) सायबर गुन्ह्यांसाठी दंडाची मुदत वाढवणे

(3) इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरीला कायदेशीर वैधता

(4) PKI ओळखणे

Which major update in IT Act, 2008 was made against IT Act, 2000 ?

(1) Increasing prison term for cyber crimes

(2) Increasing penalty term for cyber crimes

(3) Legal validity to Electronic signature

(4) Recognizing to PKI

---

**97.** खालीलपैकी कोणता प्रकल्प हा ग्राम पंचायतींना भारतभर जोडणारा आहे ज्याची निर्मिती बी.बी.एन.एल. द्वारे झाली आहे ?

(1) इंडीया नेट (2) भारत नेट

(3) भारती टेल (4) अल्का टेल

Name the project which connects all Gram Panchayati which is developed by B.B.N.L. across India.

(1) India Net (2) Bharat Net

(3) Bharti Tel (4) Alka Tel

---

**98.** ओळखले जात नसताना खाजगी संभाषण ऐकण्याची क्रिया हा कोणत्या प्रकारचा हल्ला होय ?

(1) पासवर्ड अंदाज (2) कानावर पडणे

(3) पाशवी शक्ती (4) स्पूफिंग

Act of listening to private conversation while not being detected, which type of attack is it ?

(1) Password guessing (2) Eavesdropping

(3) Brute force (4) Spoofing

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**99.** संगणकावर दूरस्थपणे लॉगइन करण्यासाठी कोणता प्रोटॉकॉल वापरला जातो ?

(1) टेलनेट
(2) एच.टी.टी.पी.
(3) डी.एन.एस.
(4) एस.एम.टी.पी.

Which protocol is used to remotely login onto a computer ?

(1) Telnet
(2) HTTP
(3) DNS
(4) SMTP

---

**100.** ICT च्या सीमावर्ती भागात (frontier areas) R&D ची कार्ये हाती घेण्यासाठी 1988 मध्ये विभागाच्या प्रशासकीय कार्यक्षेत्रात वैज्ञानिक सोसायटी म्हणून ________ ची स्थापना करण्यात आली.

(1) ई-गव्हर्नन्स
(2) आय.टी.ई.एस.
(3) आय.टी. फॉर मासेस
(4) सी-डी.ए.सी.

In order to take up R&D works in the frontier areas of ICT, ________ was established in 1988 as a scientific society under the administrative purview of the Department.

(1) e-Governance
(2) ITeS
(3) IT for Masses
(4) C-DAC

---



Teachingninja.in